दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता


प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.२० जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 20 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 234 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## ज्ञानसंपादन,संशोधन अन् प्रशिक्षणाची संधी:ऊर्जा क्षेत्रातील संशोधन व सहकार्यासंबंधी महाराष्ट्राचा कॅलिफोर्निया विद्यापीठाशी सामंजस्य करार

**मुंबई (वृत्तसंस्था)**–बर्कले येथील जागतिक किर्तीच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाशी महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संशोधन आणि धोरण विकास क्षेत्रातील सहकार्यासंबंधी सामंजस्य करार केला आहे. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी झालेल्या या कार्यक्रमाला कॅलिफोर्निया विद्यापीठाचे प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्ण बी, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीव कुमार उपस्थित होते. श्रीमती शुक्ला आणि कॅलिफोर्निया विद्यापीठाचे वरिष्ठ सल्लागार मोहित भार्गव यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

या करारामुळे महाराष्ट्रातील उर्जा क्षेत्रात संशोधन, तांत्रिक नवकल्पना आणि धोरणात्मक सहकार्याला गती मिळणार आहे. ऊर्जेचा स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणारा पुरवठा, ऊर्जा साठवणूक उपाय, वीज बाजार रचना, ग्रीड प्रसारण प्रणालीतील सुधारणा, हवामानाशी जुळवून घेणारी धोरणे आणि प्रशिक्षण कार्यक्रम या क्षेत्रांमध्ये संयुक्त काम होणार आहे.

कॅलिफोर्निया विद्यापीठासारख्या संस्थेच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात उर्जा क्षेत्रात जागतिक दर्जाचे संशोधन आणि नवसंशोधनाला चालना मिळेल. या सामंजस्य करारामार्फत उर्जा साठवणूक, वीज बाजार, प्रसारण व्यवस्था आणि हवामान बदलाशी जुळवून घेणे यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये संयुक्त संशोधन, ज्ञानाची देवाणघेवाण आणि क्षमता वृद्धी यांना चालना मिळणार आहे. स्वच्छ, विश्वासार्ह आणि शाश्वत उर्जेच्या दिशेने सहकार्याचा नवा अध्याय सुरू होत आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.महाराष्ट्र सरकार आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले यांच्यातील हे सहकार्य परस्पर विश्वास, समानता आणि सामूहिक हिताच्या तत्त्वांवर आधारित असून, राज्याच्या उर्जा क्षेत्रातील बदलत्या गरजांनुसार स्थानिक उपाययोजना विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.हा करार लवचिक स्वरूपाचा असून त्यामुळे भविष्यातील प्रकल्पांनुसार सहकार्याचे दरवाजे खुले राहतील. या करारामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि प्रशासन यांना नवसंशोधन, क्षमता वृद्धी व प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. त्यामुळे पर्यावरणस्नेही आणि शाश्वत उर्जेच्या दिशेने राज्याचा प्रवास अधिक गतिमान होईल, असा विश्वास ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी व्यक्त केला.



## चंद्रभागेत ३ महिला भाविक बुडाल्या:भोकरदनच्या दोघींचे मृतदेह आढळले, एक बेपत्ता

**सोलापूर (वृत्तसंस्था)**–पंढरपुरातील चंद्रभागा नदीत बुडून ३ महिला भाविकांचा मृत्यू झाला आहे. यापैकी २ महिलांचे मृतदेह आढळले असून, एकीचा शोध सुरू आहे. मृतांपैकी दोघी जालना जिल्ह्यातील भोकरदनच्या असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे पंढरपुरावर शोककळा पसरली आहे.



यासंबंधीच्या माहितीनुसार, उजनी धरणातून पाणी सोडल्यामुळे चंद्रभागा नदी सध्या दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे पाण्याचा अंदाज येत नसल्यामुळे भाविकांसोबत बऱ्यावाईट घटना घडत आहेत. शनिवारी सकाळी ७ च्या सुमारास ३ महिला भाविक चंद्रभागा नदीत स्नानासाठी उतरल्या होत्या. यात जालन्याच्या भोकरदन येथील २ महिलांसह एका अनोळखी महिलेचा समावेश होता. त्या नदीत उतरल्या, पण पाण्याचा अंदाज न आल्याने त्या वाहून जाऊ लागल्या. ते पाहून नदीच्या किनाऱ्यावर असणाऱ्या इतर महिला भाविकांनी आरडाओरडा सुरू केला. पण पाण्याचा वेग जास्त असल्यामुळे मदत येईपर्यंत तिन्ही महिला बुडाल्या.

त्यानंतर पोलिसांनी स्थानिक कोळी बांधवांच्या मदतीने मदतकार्य सुरू केले. त्यात सुनीता सपकाळ (४३) व संगीता सपकाळ (४०) या दोन महिलांचे मृतदेह आढळले. या दोन्ही महिला जालन्याच्या भोकरदन येथील रहिवासी आहेत. तर इतर एका अनोळखी महिलेचा शोध सुरू आहे.

## आता थांबायचं नाय; स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकवणारचं

**केज । प्रतिनिधी**

मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि मा. खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने, मा. अर्जुनजी खोतकर साहेब (उपनेते) व मा. संजयजी मोरे साहेब (सचिव) यांच्या सूचनेवरून संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेच्या रणनितीची, ताकदीची आणि संघटनेची परीक्षा पाहणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आहेत. या पार्श्वभूमीवर विधानसभा निहाय महत्त्वपूर्ण बैठक माधवबाग केज येथे पार पाडली. स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी पक्ष, संघटना कशाप्रकारे आणखी बळकट करण्यात येईल याविषयी या बैठकीत चर्चा झाली. अचूक नियोजन व त्याची योग्य अंमलबजावणी केल्याने निवडणुकीत आपण यशस्वी होऊ शकतो. निवडणुकीच्या या आव्हानासाठी आपण सर्वजण तयार आहोत त्यामुळे 'आता



थांबायचं नाय' कारण यंदा स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार उपस्थित असलेल्या सर्वांनी व्यक्त केला.

बापूसाहेब मोरे साहेब (संपर्कप्रमुख), अनिल (दादा) जगताप (जिल्हाप्रमुख शिवसेना), सचिन (भैय्या) मुळक जिल्हाप्रमुख शिवसेना, योगेश नवले (जिल्हा संघटक).बालाजी खैरमोडे (जिल्हा समन्वयक बांधकाम कामगार सेना), सुजित शिंदे (जिल्हाप्रमुख युवासेना), राजाभाऊ लोमटे (उप जिल्हाप्रमुख), रवी मुडेगावकर (जिल्हाप्रमुख बांधकाम कामगार सेना ), दादासाहेब ससाणे (शिवसेना विधानसभा प्रमुख केज), अर्जुन वाघमारे (तालुकाप्रमुख अंबाजोगाई) अभिमान (बापू) पटाईत (ज्येष्ठ नेते ), मालोजी (नाना) गलांडे पाटील (ज्येष्ठ नेते) ,विकास काशीद (केज तालुका सचिव) महेंद्र चाटे (उपतालुकाप्रमुख), दत्ता काकडे (विभाग प्रमुख), चंद्रकांत इंगळे (उपतालुकाप्रमुख), कैलास उगलमुगले (उपतालुकाप्रमुख), दादासाहेब पटाईत (उपतालुकाप्रमुख ),अजित गोरे (सरपंच बनसारोळा) ,विलासराव चोपणे, सुनील पटाईत, अरुण करपे (विभागप्रमुख), गणेश जाधव (शहरप्रमुख अंबाजोगाई), गणेश देवकते (उपतालुकाप्रमुख अंबाजोगाई), समीरण मसलवार ,(युवासेना तालुकाप्रमुख अंबाजोगाई) ,दशरथ चाटे (उपतालुकाप्रमुख अंबाजोगाई), महादेव चाटे (तालुका संघटक अंबाजोगाई), मीराताई आडे (उपजिल्हाप्रमुख महिला आघाडी), सुनीताताई जाधव (तालुकाप्रमुख अंबाजोगाई महिला आघाडी), तनुजा मुंडे (शहर प्रमुख महिला आघाडी अंबाजोगाई) वैजनाथ गायकवाड, ज्ञानेश्वर भांगे, प्रताप वैरागे, अक्षय बसवर ,आकाश काकडे ,मनोहर गोरे ,ओमकेश नेहरकर, सुशील रोकडे, सतीश ससाणे , महेश ससाणे जगन्नाथ ससाणे शाखाप्रमुख विठ्ठल झाडे आदी कार्यकर्ते शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले.

## तुलसी महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना आणि एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या वतीने तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे गुरुवार, १७ जुलै रोजी रेड रिबन क्लब नोडल अधिकारी आणि पिअर एज्युकेटर्ससाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे मार्गदर्शन डॉ. संजय राऊत (जिल्हा शल्य चिकित्सक) यांनी केले.कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात तुलसी महाविद्यालयात रेड रिबन क्लबची औपचारिक स्थापना करण्यात आली. याप्रसंगी डॉ. हनुमंत पारखे (बालरोग तज्ज्ञ), श्री. सुहास कुलकर्णी (जिल्हा



कार्यक्रम अधिकारी), श्री. फासियोद्दीन फारुकी (मॉनिटरिंग अॅण्ड इव्हॅल्युएशन ऑफिसर), श्री. आर.सी. घनघाव (समुपदेशक, सुरक्षा क्लिनिक), श्रीमती. आर.जे. हिरवेकर (खउढउ समुपदेशक), श्री. जनार्धन माचपल्ले, श्री. नवनाथ चव्हाण (जिल्हा लेखा सहाय्यक) व प्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे उपस्थित होते.

कार्यशाळेत एड्सचे कारण-लक्षणे, प्रतिबंध, समाजातील गैरसमज दूर करणे, युवकांची जबाबदारी, रेड रिबन क्लबची कार्यपद्धती व वर्षभराचे उपक्रम याविषयी सखोल पीपीटी सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. युवकांनी आरोग्यविषयक जनजागृतीसाठी पुढे यावे, यावर भर देण्यात आला. या उपक्रमात बीड जिल्ह्यातील ३० महाविद्यालयांतील रेड रिबन क्लब नोडल अधिकारी व पिअर एज्युकेटर्स सहभागी झाले. प्रशिक्षणार्थ्यांना भोजन, चहा आणि प्रमाणपत्र देण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्रीमती राजश्री हिवरेकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतासाठी खउढउ, डापकु, डीएसआरसी टीम, महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले.

## केज बसस्थानका वरून ४० वर्षीय महिला बेपत्ता

**केज । गौतम बचुटे**

पती व मुलासह गावाकडून आलेली ४० वर्षीय महिला ही बसमधून उतरल्या नंतर बेपत्ता झाल्याची घटना केज शहरातील बस स्थानकावर घडली आहे.


केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील दादासाहेब धर्मा ठोंबरे, त्यांची पत्नी अनिता व त्यांचा मुलगा गणेश हे तिघे १४ जुलै रोजी सकाळी ११:०० वा. गावातून बसमध्ये बसून केजला कामा निमित्त आले होते. ही बस शहरातील बसस्थानकात आल्यानंतर त्यांची पत्नी अनिता दादासाहेब ठोंबरे वय ( ४० वर्ष) या त्यांच्या अगोदर बसमधून गर्दीतून खाली उतरल्या. त्या नंतर उशिराने दादासाहेब ठोंबरे व त्यांचा मुलगा गणेश ठोंबरे हे बस मधून खाली उतरले. तो पर्यंत अनिता ठोंबरे या बेपत्ता झाल्या होत्या. त्यांनी बसस्थानक परिसर आणि नातेवाईकांकडे चौकशी केली असता त्यांचा तपास लागला नाही. अनिता ठोंबरे यांचा रंग सावळा असून उंची पाच फूट आहे. अंगावर रेघा असलेली हिरव्या पिवळ्या रंगाची साडी असून पायात चप्पल आहे.


त्यांचे पती दादासाहेब ठोंबरे यांच्या तक्रारी वरून केज पोलिसात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक त्रिंबक सोपणे हे करीत आहेत.

## केज शहरातील विज वितरण कंपनीची साठी टक्के वसुली पुर्ण-उप कार्यकारी अभियंता एम.जी.सय्यद यांची माहिती

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील अर्बन विज वितरण कंपनीने साठ टक्के विज बिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण केले असल्याची माहिती केज येथील उप कार्यकारी अभियंता एम.जी.सय्यद यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.विज वितरण कंपनीची एकुण थकबाकी १ कोटी २८ लाख रुपये आहे.त्यापैकी ७५ लाख रुपये वसूल करण्यात आले असून ३४१ लाख रुपये थकबाकी असल्याचे त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.केज शहरात विजबिल वसुली मोहीम राबविण्यात येत आहे. विज वितरण कंपनीचे कर्मचारी प्रत्यक्ष ग्राहक यांच्या भेटी घेऊन विज बिल भरण्याचे आवाहन करत असुन थकबाकी दार ग्राहक विज बील भरण्यासाठी चांगला प्रतिसाद देत आहेत. त्यामुळे विज बिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विज ग्राहक सहकार्य करताना दिसत आहेत. विज बिलाची रक्कम रोख स्वरूपात स्विकारत आहेत त्यामुळे त्यामुळे ग्राहकांना विना अडथळा बिल भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.या बद्दल ग्राहक समाधान व्यक्त करताना दिसत आहेत.यावेळी विज वितरण कंपनीचे उप कार्यकारी अभियंता एम.जी.सय्यद,विज वितरण सहाय्यक विष्णु तेलंग यांच्या सह विज वितरण कंपनीचे कर्मचारी विज बिल वसुलीचे काम करत आहेत.








संपादकीय

# अरण्यातले वनऋषी

ज्येष्ठ साहित्यिक आणि अरण्यऋषी असे ज्यांना आदराने नाव दिलेले होते असे मारूती चितमपल्ली यांना वयाच्या ९३ व्या वर्षी देवाज्ञा झाली. ९३ वर्षे हे काही लहान-सहान आयुष्य नव्हे. पण त्या आयुष्यात हा माणूस पक्षी आणि प्राण्यांचा मित्र होता आणि त्यांचा अभ्यासक होता. त्यासाठी त्यांनी वनक्षेत्रपाल नोकरी करत असताना आपले आयुष्य या आपल्या मुक्या मित्रांसाठी वेचले आणि लोकांना प्राणी आणि पक्ष्यांची महती सांगितली. नुसती सांगितलीच नव्हे तर लोकांमध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून काम केले. त्यांना अरण्यऋषी म्हटले गेले. पण ते खरोखरच अरण्यातील तपस्वी होते आणि त्यांनी या आपल्या मुक्या मित्रांसाठी आयुष्यभर खूप काही केले आणि त्यांचा अभ्यास केला. चितमपल्ली यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि त्यांचे 'चकवाचांदण' असो किंवा 'नवेगाव बांधचे दिवस' असो, जंगलातील एक विलक्षण अनुभूती देते. चितमपल्ली यांनी लौकिकार्थाने वानिकी विद्या शिकून सरकारी नोकरी केली आणि अखेरपर्यंत ते वन्य जीवांसाठी जगले. सोलापूर येथे जन्मलेले चितमपल्ली यांनी आपले उर्वरित जीवन विदर्भात घालवले आणि विदर्भातील जंगलांत त्यांनी आयुष्यातली उमेदीची वर्षे घालवली. त्यांनी केवळ वन खात्यात नोकरी केली नाही, तर संस्कृत पाठशाळेत अध्ययनही केले आणि जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यासही केला. पण त्यांचे जीवन वनाधिकारी म्हणून कार्य करण्यासाठी वेचले आणि त्यात त्यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायचे कसे हे शिकवले. कर्नाळा पक्षी अभयारण्य, मेळघाट प्रकल्प आणि नवेगाव येथील प्रकल्पांच्या विकासात त्यांचे योगदान आहे. पण त्यांची ओळख आहे ती म्हणजे निसर्ग आणि पर्यावरणाशी नाळ जोडलेला माणूस म्हणून आणि हीच त्यांची ओळख शेवटपर्यंत कायम होती. चितमपल्ली यांच्या आईने त्यांना प्रथम जंगलावर प्रेम करायला शिकवले. १९६० मध्ये महाराष्ट्रात त्यांची वनाधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील जंगलाचा अभ्यास केला आणि इतरांनाही शिकवला. त्यांचे पहिले वनाधिकारी म्हणून दशक कोकणात गेले, ज्यावेळी तेथे कोणतेही राष्ट्रीय उद्यान अथवा अभयारण्य नव्हते. पण त्यांचा अभ्यास आणि निसर्गाचे वाचन खरे सुरू झाले ते नवेगाव येथे नियुक्ती झाल्यावर आणि तेथील माधवराव पाटील यांना भेटल्यावर. त्यांनी साहित्यात ही सारी पात्रे अजरामर केली आहेत. माधवराव पाटील हे तर साधे शिकारी होते. पण त्यांना या अरण्यऋषीचा सहवास घडला आणि ते जंगलाचे अभ्यासक बनले. महाराष्ट्रातील रहिवाशांमध्ये जंगले लोकप्रिय करण्याचे श्रेय निःसंशय चितमपल्ली यांच्याकडेच जाते. कारण त्यांच्यामुळेच आज लोक जंगलाकडे वळले आहेत आणि लोकांत जंगले पाहण्याची आवड निर्माण झाली आहे. साहित्यिक म्हणून त्यांचे श्रेय प्रचंड आहे आणि त्याचे पहिले पुस्तक 'पक्षी जाय दिगंतरा.' हे आले तेव्हा ते बेस्ट सेलर ठरले. तेव्हा हा कोण नवीन लेखक आला आहे असा प्रश्न मान्यवर साहित्यिकांना पडला होता. नंतर चितमपल्ली हे सर्वपरिचित झाले आणि ते महाराष्ट्रात लोकप्रिय लेखक बनले. त्यांच्या पुस्तकांनी नवीन शैली सुरू केली आणि नवीन लेखकांना प्रोत्साहन दिले असे तज्ज्ञांचे मत आहे. हा माणूस कायम जंगलात वास्तव्याला असायचा आणि त्यामुळे त्यांचे जीवन जंगलातील हवेने, तेथील ताज्या घटनांनी समृद्ध झालेले होते आणि त्यांच्या नियमित परिघाला समृद्ध करणारा अनुभव देणारा लेखक जन्माला आला होता.

साहित्यिक या दृष्टीने चितमपल्ली यांचे जीवन, लेखन आणि अनुभव हे इंग्रजी लेखकाच्या जवळ जातात. कित्येक नामवंत लेखक असे आहेत की, त्यांनी आपल्या लेखनासाठी चाकोरीतील आयुष्य सोडले आहे आणि नवीन आयुष्य सुरू केले. चितमपल्ली त्यातच गणले जातात. त्यांनी आयुष्यभर जंगलातील माणूस म्हणून जगण्यात समाधान मानले आणि तरीही त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही. चितमपल्ली यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायला शिकवले असे जे म्हटले ते या अर्थाने. ते कित्येक वेळा पक्ष्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास करत असत आणि त्यांच्या नोट्स घेत असत. त्यातून त्यांची अनेक पुस्तके जन्माला आली. चितमपल्ली हे सरकारी नोकरी करत राहून व्रतस्थ होते आणि त्यांनी पक्षी कोश लिहिला तेव्हा त्यात ४०० हून अधिक पक्ष्यांचा त्याच्या स्थलांतराचा अभ्यास त्यात आहे. त्यांची एक खंत होती ती म्हणजे आजचे वनपाल पुरेसे निरीक्षण करत नाहीत आणि नोंदी घेत नाहीत. कित्येक वनपाल तर केवळ टाकणे याच एका हिशोबात काम करत असतात. अर्थात चितमपल्ली यांना जे पाहिजे होते ते आज कुणीही करणे शक्य नाही. कारण आज जो तो पगार आणि आपण इतकेच पाहत असतो. त्यामुळे चितमपल्ली खंत घेऊन गेले हे त्यांचे प्रारब्धच होते. महाराष्ट्रातील जंगलात ३६ वर्षे वास्तव्य करून अत्यंत समृद्ध अनुभव गाठीशी बांधून चितमपल्ली आज आपल्यात नाहीत. चितमपल्ली यानी केवळ जंगलावर पुस्तके लिहिली आहेत आणि त्यात 'रानवाटा' जसे आहे तसेच 'रातवा' आणि कितीतरी आहेत.सोलापूरमध्ये झालेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तरुणालाही लाजवेल अशा पद्धतीने आणि तडफेने काम करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्यांनी 'पक्षी कोश' लिहिला तसेच 'वृक्ष कोश' लिहिण्याचे त्यांचे काम अर्धवट राहिले. अरण्य वाचन आणि सतत कार्यरत राहणारा ऊर्जावान असा हा लेखक होता. पण आज त्यांचा जीवनप्रवास काळाने संपवला आहे. त्यासाठी लागणारी माहिती मिळवण्यासाठी वाट्टेल ते कष्ट करण्याची तयारी त्यांची होती. त्यामुळे 'पक्षी कोश' त्यांच्याकडून लिहून झाला. त्यांच्या पुस्तकात प्राणी जीवनाबद्दल मनोरंजक माहिती आहे. चितमपल्ली यांच्या मते अनेक वृक्ष पावसाचे संकेत देतात. बिब्याच्या झाडाला फुले लागली, तर त्या भागात दुष्काळ पडतो असे त्यांचे निरीक्षण होते. असे अनेक मनोरंजक, निरीक्षण आणि ज्ञान त्यांच्या लेखनात होते. चितमपल्ली यांना भावपूर्ण श्रद्धांजली. चितमपल्ली यांच्यासारखे लोक आता होणार नाहीत. हा ठेवा आहे. तो काळाने न मागता आपल्याला दिला होता आणि न सांगता नेलाही.

# आपली सायबर सुरक्षा आपल्याच हाती...



कोरोनासारखे संसर्गजन्य आजार जरी धोकादायक असले तरी औषधांनी आणि योग्य उपचारांनी बरेही होऊ शकतात. या उलट सायबर अटॅक असे असतात की, आपण जेवढे थांबवायला बघू तेवढे ते नवनवीन पद्धतीने आणि मार्गांनी वाढतच जातात. बरं त्यांचे लक्ष्य केवळ श्रीमंत उद्योजकच नसतात, तर कोणीही त्यांचे शिकार होतात, कारण आता गरीब असो की श्रीमंत, शहरातला असो की ग्रामीण, सर्वांकडेच इंटरनेट आणि स्मार्ट फोन असतात. अनेकांना टेक्नॉलॉजीचे ज्ञान नसते आणि याचाच फायदा सायबर हल्लेखोर लीलया घेतात.

अलीकडेच काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटनासाठी आलेल्या भारतीय नागरिकांवर पाकिस्तानी दहशतवाद्यांनी क्रूर हल्ला करून २६ निष्पाप नागरिकांचे प्राण घेतले. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर जोरदार रॉकेट हल्ले करत अवघ्या २२ मिनिटांमध्ये ते सर्व तळ बेचिराख केले. हा हल्ला इतका जबरदस्त आणि अचूक होता की, पाकिस्तानला अक्षरशः भारतापुढे गुढघे टेकावे लागले. मात्र युद्धाची सुरुवात होताच पाकिस्तानी सायबर हल्लेखोरांनी भारताच्या प्रमुख वित्तीय संस्था, सरकारी वेबसाइटसवर हल्ले सुरू केले. भारत सरकारच्या एका अधिकृत माहितीनुसार या सायबर हल्लेखोरांनी भारताच्या विविध वेबसाइटरवर ७०० पेक्षा जास्त हल्ले केले. यात त्यांनी भारतातील सर्वसामान्यांना लक्ष्य केले होते. उदा. भारतीय सेनेचा पाकिस्तानच्या कराची बंदरावर हल्ला. बघा कसे भारताने अचूक हल्ले करून पाकिस्तानला केले नामोहरम.... हे बघा भारतीय युद्ध विमाने पाडल्याचे पुरावे... असा व्हीडियो लिंक आणि एपीके फाइल्स तयार करून हे हल्ले करण्यात आले. जो कोणी उत्सुकतेने या लिंकवर क्लिक करत असे त्याचे बँक खाते लगेचच हॅक करून त्यातील रक्कम परस्पर दुसऱ्या खात्यात वळवली जात असे. इकडे लिंकवर क्लिक केले की अवघ्या काही सेकंदात त्या व्यक्तीचे खाते हॅक करून आर्थिक लुबाडणूक केली जात होती.

अलीकडच्या काळात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. मुंबईतील वडाळा येथे राहणारा एक व्यापारी गुजरातमध्ये तीर्थयात्रेला गेला होता. यादरम्यान स्कॅमरने त्यांच्या डीमॅट खात्याशी जोडलेला मोबाइल संपर्क नंबर बदलला आणि त्या व्यापाऱ्याच्या ई मेल खात्याशी मिळता-जुळता बनावट ई मेल तयार केला व त्याच्या खात्यातील तब्बल २० लाख रुपयांचे शेअर्स परस्पर अन्य खात्यात वळवले.

अन्य एका घटनेमध्ये सायबर भामट्याने मुंबईतील एका नामवंत कंपनीच्या ई मेल खात्याशी साधर्म्य असणारे ई मेल खाते तयार केले व या कंपनीशी व्यवहार करणाऱ्या एका महिलेला तिच्या त्या बनावट ई मेलद्वारे संपर्क केला आणि तिला तिच्या बँक खात्यातील ११ लाख रुपये त्याच्या खात्यात जमा करण्यास राजी केले. ते ई मेल खाते कंपनीच्या ई मेल खात्याशी मिळत-जुळत असल्याने त्या महिलेने कोणतीही खातरजमा न करता पैसे सांगितले त्या खात्यात वळवले. काही दिवसांनी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्या महिलेने मुंबई पोलिसांच्या सायबर शाखेत तक्रार केली. तांत्रिक मदतीच्या आधारे पोलिसांनी त्या सायबर चोराला पकडले व त्या महिलेचे पैसे तिला परत केले. हे सायबर हल्लेखोर आपले सावज हेरण्यासाठी सोशल मीडियाचा मोठ्या खुबीने वापर करतात. विशेष अपडेट, युद्धाशी संबंधित दृष्ये किंवा लिक झालेल्या फुटेजेसचा वापर करून मालवेअर, स्पायवेअर किंवा फिशिंग वेबलाइटसच्या लिंक देऊन सर्वसामान्यांना आकर्षित करतात. हे काम व्हॉटसअ‍ॅप आणि टेलिग्रामच्या माध्यमातूनही केले जाते. त्यामुळे सायबर शाखा पोलिसांनी सर्वांसाठी काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. व्हॉटसअ‍ॅप आणि टेलिग्राम वापरणाऱ्यांनी विश्वासू व्यक्तीने पाठवल्या असल्या तरी अज्ञात व्हीडियो, फोटो अथवा बातम्यांच्या लिंक उघडू नयेत. त्याचप्रमाणे असे संदेश पुढे पाठवूही नयेत. मेसेजिंग अ‍ॅपद्वारे पाठवण्यात आलेल्या -झघ फाइल्स आपल्या मोबाइल अथवा संगणकावर इन्स्टॉल करणे टाळावे, विवादित अपडेट किंवा संवेदनाशील फुटेज दाखवण्याचा दावा करणाऱ्या फॉरवर्ड केलेल्या लिंक उघडू नका, ज्ञात व्यक्तींनी पाठवलेले ई मेल उघडू नका, आवश्यक नसलेल्या ई मेलच्या लिंक डाउनलोड करणे टाळा, कोणताही ई मेल उघडताना पत्ता काळजीपूर्वक तपासा, कारण फिशिंग अथवा स्पॅम ई मेल बहुतांशवेळी कायदेशीर संस्थांची हुबेहूब नक्कल करतात. सोशल मीडियावर आलेल्या व्हीडियो लिंकची खात्री नसेल तर ती उघडण्याचा प्रयत्न करू नका.

बाह्य किंवा क्लाउड स्टोरेजचा नियमित बॅकअप घ्या. आपले पासवर्ड कोणासोबत शेअर करू नका. आपली वैयक्तिक माहिती सोशल मीडियावर प्रसारित करू नका. संगणक किंवा मोबइलमध्ये एंटीव्हायरस सॉफ्टवेअर नियमित अपडेट करा. खात्री नसेल असे संदेश सोशल मीडियावर फॉर्वर्ड करू नका. थोडक्यात काय तर आपली सुरक्षा ही पोलिसांची जबाबदारी असली तरी ती तितकीच आपलीही आहे. थोडेसे सावधान-सतर्क राहिले तर आपली लुबाडणूक टाळता येऊ शकते. त्याचप्रमाणे सोशल मीडिया वापरताना थोडी काळजी घेतली आणि वैयक्तिक गुप्तता पाळली तर ते आपल्या आर्थिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते.

# ही युद्धखोरी कुठे नेणार?



१० जून रोजी सीबीएस न्यूजने सूत्राच्या हवाल्याने अमेरिकन अधिकाऱ्यांना सांगितले होते की, इस्रायल इराणमध्ये लष्करी कारवाई करण्याची पूर्वतयारी करत आहे. अमेरिकेला भीती होती की इस्रायलने इराणवर हल्ला केल्यास इराण शेजारी इराकमधील काही अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले करून प्रत्युत्तर देऊ शकतो. १२ जूनच्या रात्रीपासून इस्रायलने इराणवर प्रथम क्षेपणास्त्रांचा वर्षाव, त्यापाठोपाठ विमाने आणि ड्रोणद्वारे हल्ले सुरू केले. इस्रायलने केलेल्या या भीषण हल्ल्यात इराकचे सैन्य, हवाई संरक्षण प्रणाली आणि आण्विक कार्यक्रमाच्या दृष्टीने अतोनात नुकसान झाले. इराण लष्कराचे मुख्य अधिकारी प्रमुख हुसेन सलामी आणि मेजर जनरल बघेरी यांच्याबरोबर कैक कमांडर तसेच सहा शास्त्रज्ञदेखील मरण पावले. प्रत्युत्तरादाखल इराणनेदेखील इस्रायलवर क्षेपणास्त्रांद्वारे हल्ले केले. त्यांनी इस्रायलच्या तेल अविवसह इतर प्रमुख शहरांचे नुकसान झाले. पाश्चात्त्य गुप्तचर संस्थांनी २००२ मध्ये इराणचा गुप्त आण्विक कार्यक्रम उघड केला होता. त्यानंतर बरीच वर्षे इराणी अधिकारी उघडपणे अण्वस्त्रे तयार करण्याची धमकी देत होते. मध्यंतरी हेलिकॉप्टर अपघातात इराणचे अध्यक्ष आणि परराष्ट्र मंत्री ठार झाले, तेव्हाही त्या घटनेत इस्रायलचा हात असल्याचे आढळल्यास गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल, अशी धमकी इराणने दिली होती. त्यावेळीदेखील इराण अण्वस्त्र संपन्न असल्याची शंका जगाला आली होती. डिसेंबर २०२४ मध्ये इराणचे माजी परराष्ट्रमंत्री कमल खराझी यांनी इस्रायलला सरळ सरळ आण्विक हल्ल्याची धमकी दिली. तेव्हापासूनच अस्वस्थ असणाऱ्या इस्रायलकडून इराणवर मोठा हल्ला होणार हे निश्चित होते, तसा तो झाला आणि जगभरात गदारोळ माजला.

इराणकडे आधीच अण्वस्त्रे आहेत आणि त्यांनी अद्याप त्यांची चाचणी केलेली नाही, असा दावा इराणी संसदेच्या परराष्ट्र धोरण समितीच्या माजी सदस्याने १० मे रोजी केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना इराण आण्विक हत्यार बनवण्याच्या अगदी जवळ पोहोचला असल्याचे सांगितले. त्यामुळे या देशावर कठोर निर्बंध लादणे गरजेचे आहे, असे विधान करत त्यांनी इराणच्या तेल निर्यातीला लक्ष्य करण्याचा आदेश दिला. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्रायलची ढाल बनून उभ्या असलेल्या अमेरिकेलाही युद्धाच्या आगीत जाळण्याची धमकी दिली. या धमकीच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने अरबी समुद्रात लष्कराची तैनाती वाढवली. इस्रायलची सुरक्षितता हे अमेरिकेला चिंता वाटण्याचे कारण नव्हे, तर इराणच्या अण्वस्त्र संपन्नतेबाबतही अमेरिका साशंक आहे. म्हणून अमेरिकेने इस्रायलच्या आडून इराणवर हल्ले केले, असे म्हणायला जागा आहे. इस्रायलास इराणच्या अणुबॉम्बनिर्मितीच्या प्रयत्नांची आणि ते लपवून ठेवल्याची शंका आहे. आपल्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्यास इराण शत्रू राष्ट्रावर अण्वस्त्र हल्ला करण्यास कदापी कचरणार नाही. कट्टरवादाची पार्श्वभूमी असलेले काही देश युद्धप्रसंगी काय निर्णय घेतील याची कोणताच देश हमी देऊ शकत नाही. या व्यतिरिक्तही अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांना इराणबाबत भीती वाटते.

अण्वस्त्रे बनवण्याचे तंत्रज्ञान इराणने पाकिस्तानकडून मिळवले असण्याची शंका आहे. आपल्या देशात अतिरेकी संघटनांना थारा देणाऱ्या पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे कितपत सुरक्षित आहेत, याबद्दलही साशंकता आहे. तीच परिस्थिती इराणच्या बाबतीतही आहे. सीरिया, येमेन, पॅलेस्टिन आणि लेबनॉनमध्ये असलेल्या इस्रायलविरोधी हमास आणि हिजबुल्लाह यांच्या हाती ही अण्वस्त्रे पडल्यास अवघ्या जगात हाहाकार उडेल, ही भीती व्यक्त करताना इस्रायलने इस्फहान अणू तंत्रज्ञान केंद्राजवळ हल्ला केला होता. यामध्ये अणू संशोधन अणुभट्टी, युरेनियम रूपांतरण प्रकल्प आणि इंधन उत्पादन प्रकल्प आहे. पण त्यावेळी या हल्ल्यात इराणच्या अण्वस्त्र केंद्रांना इस्रायलने थेट लक्ष्य केले नसले तरी, इराणच्या नेतृत्वाने आपल्या आण्विक धोरणावर पुनर्विचार करण्यासाठी धमकी म्हणून हे हल्ले केल्याचे इस्रायलने स्पष्ट केले. मात्र तरीही इराणने आपला आण्विक कार्यक्रम पुढे चालू ठेवल्याने १२ जून रोजी इस्रायलने इराणच्या आण्विक ऊर्जा प्रकल्पावर हल्ले केले.गेल्या काही दिवसांपासून इस्राएल आणि इराणमधील तणाव त्यांच्या पारंपरिक प्रॉक्सी स्वभावापासून दूर गेला आणि एकमेकांच्या प्रदेशांवर थेट हल्ल्यांच्या रूपात प्रकट झाला. इराणच्या आण्विक समस्येवर वेळेवर आणि गैरलष्करी तोडगा काढण्याची गरज वाढली म्हणूनच ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी आल्यावर इराणवर व्यावसायिक निर्बंध लादायला सुरुवात केली. पण आजवरचा इतिहास पाहता इराण त्याकडे कितपत गांभीर्याने पाहील याबाबत इस्रायल साशंक होता. त्यातूनच या देशाने मोसाद या आपल्या गुप्तचर यंत्रणेद्वारे इराणच्या आण्विक कार्यक्रमाची गुप्त माहिती काढली आणि कथित धोका लक्षात येताच हे हल्ल्याचे पाऊल उचलले, असे म्हणायला जागा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून इराणने हमास आणि हिजबुल्लासारख्या इस्रायलविरोधी दहशतवादी संघटनांना पाठिंबा म्हणून शस्त्रास्त्रे खरेदीसाठी खूप पैसा खर्च केला. त्यामुळे त्यांना इस्रायलशी दोन हात करायला मदत झाली. इराण या दहशतवादी संघटनांना मदत म्हणून लष्करी तळ, शस्त्रास्त्रांचे डेपो आणि क्षेपणास्त्र कारखाने चालवतो.

इस्रायलच्या मते इराण गुप्तपणे अण्वस्त्रनिर्मिती करण्याच्या मार्गावर असून त्याची युरेनियम समृद्धीकरणाच्या क्रियाकलापांची व्याप्ती अज्ञात आहे. अशा परिस्थितीत इराणने अण्वस्त्रनिर्मिती केल्यास ती दहशतवादी संघटनांच्या हाती लागण्याची शक्यता आहे. अशी अण्वस्त्रे दहशतवाद्यांकडून कोणाही देशाविरुद्ध वापरली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच इस्राएल इराणविरुद्ध करत असलेल्या कारवाईला अमेरिकेसाठी पाश्चात्त्य देशांचा ठाम पाठिंबा असेल. यातून अगदी जागतिक युद्धाला सुरुवात होण्याची शक्यता नसली तरी हिजबुल्लाह दहशतवादी संघटनेमुळे लेबनॉनसारखा एखादा देश यात ओढला जाण्याची शक्यता आहे. एका वेळी पाच-सहा राष्ट्रांशी दोन हात करणाऱ्या इस्रायलला त्याने फारसा फरक पडत नसला तरी यावेळी इस्रायलने इराणवर केलेले हल्ले पाहता कोणाचाही विरोध न जुमानता आरपारची लढाई करण्याचा इरादा केल्याचे स्पष्ट जाणवत आहे. इस्रायलने इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचे अतोनात नुकसान केल्यावर इराणचे संरक्षणमंत्री मोहम्मद बघेरी यांनी इस्रायलने इराणवरील हल्ले ताबडतोब न थांबवल्यास पाकिस्तान इस्रायलविरुद्ध अण्वस्त्रांचा वापर करेल, असे विधान करून खळबळ उडवून दिली तेव्हा इराणनंतर पाकिस्तानची अण्वस्त्रे इस्रायल आणि अमेरिकेकडून नष्ट केली जातील, अशी अटकळ बांधली जाऊ लागली. त्यानंतर युद्धाच्या पाचव्या दिवशी इराण-इस्रायलमधील संघर्ष विकोपाला जाऊन, इस्राइलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी इराणी जनतेने राजधानी तेहरान हे शहर सोडून जावे असे फरमान काढले. एकीकडे इराणचे राष्ट्रपती खामेनी यांना मारल्याशिवाय हे युद्ध थांबणार नाही अशी घोषणा इस्रायलकडून केली जात होती, तर खामेनी कुठे आहेत याची माहिती आमच्याकडे असून आत्ता त्यांना टार्गेट करायचा कोणताही इरादा नसल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले.अमेरिकेने या हल्ल्यात आपली कोणतीही भूमिका नव्हती हे स्पष्ट केले आहे. ११ जूनला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्रे बनवू देणार नाही असे वक्तव्य केले होते. १६ जून रोजी कॅनडातील अल्बर्टा येथील कनानास्किस येथील जी-७ शिखर परिषदेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भाग घेतला होता. त्या परिषदेत सर्व देशांनी एकमताने इस्रायलची कारवाई योग्य असल्याचा ठराव मंजूर करत पूर्ण पाठिंबा दिला. त्याच दिवशी डोनाल्ड ट्रम्प संमेलन सोडून अमेरिकेला परतले. तेव्हाच ते काहीतरी मोठी घोषणा करणार हे निश्चित झाले. इराणच्या हवाईक्षेत्रावर पूर्णपणे आमचे वर्चस्व प्रस्थापित झाले असून इराणने त्वरित युद्धातून बिनशर्त माघार घ्यावी अन्यथा परिणाम वाईट होतील, अशी धमकीही दिली. या घोषणेद्वारे चालू युद्धात आपलाही सहभाग असल्याचे आणि इराणवर अमेरिकेकडूनही हल्ले होणार याचे सरळ संकेत मिळाले. हिंद सागरात अमेरिकेने आपल्या विमानवाहू नौका हलवल्यावर या संकेतांना दुजोरा मिळाला. अशा परिस्थितीत पाश्चिमात्य देश आणि काही मुस्लीम राष्ट्रे युद्धात उतरतील आणि तिसऱ्या जागतिक युद्धाला सुरुवात होईल असा अंदाज काही संरक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. एक युद्ध एखाद्या विकसित किंवा विकसनशील देशाला १५-२० वर्षे मागे घेऊन जाते आणि अशा युद्धात जाणारे निष्पाप जनतेचे बळी आणि होणारे हाल तर कैक वर्षांचा आघात करून जातात.

# तुलसी शैक्षणिक समूह आयोजित 'सन्मान संघर्षाचा' कार्यक्रमात मनीषाबाई कदम आणि त्यांच्या तीन कन्यांचा गौरव

## संघर्षातून घडवलेले यश हीच खरी मातृत्वाची ताकद-प्रा.प्रदीप रोडे

**बीड । प्रतिनीधी**

प्रतिकूल परिस्थितीतून मुलीला पुढे नेण्यासाठी धैर्य, जिद्द आणि संघर्षाची शिकवण देणारी जी व्यक्ती असते, ती म्हणजे 'आई'. आई हीच आपल्या आयुष्यातील पहिली गुरु असते. ती केवळ रडायला शिकवत नाही, तर संकटांशी लढायला शिकवते आणि आपल्या लेकराचं भविष्य घडवते, असे भावस्पर्शी उद्गार देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी 'सन्मान संघर्षाचा' कार्यक्रमात काढले.तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित 'सन्मान संघर्षाचा' या विशेष कार्यक्रमात परळी वैजनाथच्या मनीषा विजय कदम आणि त्यांच्या तीन कन्यांचा गौरव करण्यात आला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मनीषाबाईंनी धुणीभांडी करून आपल्या तीन मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवले. त्यांच्या अथक कष्टातून दिक्षा, सोनाली आणि समीक्षा यांनी यश मिळवत सरकारी सेवेत प्रवेश करत समाजापुढे एक आदर्श निर्माण केला. हा गौरव समारंभ शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे पार पडला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



प्रा.प्रदीप रोडे यांनी वरील मत व्यक्त केले.

या वेळी प्राचार्य डॉ. विश्वास कांधारे, कालिकादेवी महाविद्यालय, शिरूर कासार, डॉ.धम्मपाल घुंबरे, डॉ.विक्रम धन्वे, डॉ.संजय सावते, प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. यानंतर दिक्षा, सोनाली, समीक्षा व त्यांच्या आई मनीषा कदम यांचा स्मृतिचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ व प्रेरणादायी पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सोनाली आणि समीक्षा म्हणाल्या, मेहनत, संयम, अभ्यास, सातत्य आणि योग्य वेळी मिळालेलं मार्गदर्शन यामुळे आमची घडण झाली. त्यांच्या चेहऱ्यावर झळकणारा आत्मविश्वास आणि डोळ्यांतून व्यक्त होणारी कृतज्ञता उपस्थितांना भारावून गेली.

प्रा.प्रदीप रोडे पुढे म्हणाले, कामाची लाज बाळगली तर यश मिळणार नाही. मेहनत करा, चिकाटी ठेवा, वाचा आणि स्वतःला घडवा. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचनाच्या बळावर जागतिक कीर्ती मिळवली. वाचन हेच खरं सामर्थ्य आहे. आपल्या आणि आपल्या पालकांच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येक संधीचं सोनं करा.प्राचार्य डॉ. विश्वास कांधारे यांनी आपल्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, थोर महापुरुषांचे विचार आणि त्यांच्या चरित्र आत्मसात केल्याशिवाय यशाचा खरा मार्ग सापडत नाही. समाजात वाढणाऱ्या विकृतींपासून दूर राहणे, सकारात्मक विचारांची देवाणघेवाण करणे आणि स्वच्छ विचारसरणी जोपासणे हे आजच्या काळात अत्यंत आवश्यक आहे. आई-वडील, गुरुजन आणि समाजाप्रती प्रामाणिक राहिल्यास यशाला कोणीही अडवू शकत नाही, असे म्हणाले. उपस्थित मान्यवरांनी या कुटुंबाच्या संघर्षकथेला कृतज्ञता व्यक्त केली आणि हा संघर्ष नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.प्रास्ताविक डॉ. विक्रम धन्वे, सूत्रसंचालन डॉ. संजय सावते, आणि आभार प्रदर्शन प्रा. शिल्पा बोराडे यांनी केले. कार्यक्रमास तुलसी शैक्षणिक समूहाचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# MPDA कायद्याअंतर्गत एका वाळु माफीयाची हर्सूलकारागृहात रवानगी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुंडगिरीचे समूळ उच्चाटनकरण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन MPDA कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर तसेच वाळुमाफीयावर चझऊ- कायद्या अंतर्गत कार्यवाही करण्याचे योजिले आहे. या पार्श्वभुमीवर पोलीस अधीक्षक, बीड यांचे सुचनेवरुन सहा. पोलीस निरीक्षक श्री. नारायण एकशिंगे पोलीस ठाणे चकलांबा, जि. बीड यांनी दिनांक २२.०८.२०२४ रोजी इसम नामे सुरज विठ्ठल ढाकणे वय २७ वर्षे रा. मुंगी ता. शेवगांव जि. अहील्यानगर याचे विरुद्ध MPDA कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस ठाणे चकलांबा येथे खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा टाकणे, जाळपोळ करणे, गौण खनिज वाळुची चोरी करणे वाळुचोरीचा प्रयत्न करणे, सरकारी कामात अडथळा आणणे सरकारी नौकरावर हल्ला करणे, मारहाण करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे अवैद्यशस्त्र बाळगणे, वगैरे स्वरुपाचे ०९ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सर्व गुन्हे न्याय प्रविष्ठ आहेत. सदरील इसम हा गौण खनिज वाळुचोरीचे व इतर गंभीर स्वरुपाचे गुन्हेकरत असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजरहोती. सदर इसमावर यापूवी उीझउ ११० प्रमाणे दि.०५.१०.२०२३ रोजी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानतापुन्हा चढत्याक्रमाने गुन्हेकरण्याचे चालुच ठेवून होता. त्याची पोस्टे चकलांबा हद्दीत व लगतच्या परीसरात दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्याससमोर येत नाहीत.

सदर प्रकरणात श्री. अविनाश पाठक, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक १९.०९.२०२४ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करूनसदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसुलकारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध करणे बाबत त्यांचेकडील आदेशक्रमांक जा.क्र. २०२४/आरबी डेस्क- १/ पोल-१/ एम.पी.डी.ए १५ दिनांक १९.०९.२०२४ अन्वये आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनीसदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना स.पो.नि.श्री. नारायण एकशिंगे पो.स्टे. चकलांबा यांना दिल्या होत्या, स्थानबध्दतेचे आदेश पारीत झाल्य १ पासुन सदरचा इसम हा स्वतः चे अस्तीत्व लपवुन वावरत होता, तसेच तो पोलीसांना गुंगारा देवून फरार होता. सदरची बाब ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या चानाक्ष नजरेतुन लपवुन राहीली नाही. त्यांनी श्री. संदीप पाटील स.पो.नि चकलांबा व श्री शिवाजी बंटेवाड पोनि स्थागुशा, बीड यांना आदेशीत करून सदर वाळुमाफीयास तात्काळ ताब्यात घेवुन स्थानबध्द करण्याच्या सुचना दिल्या होत्या. तेव्हा पासून पोलीस त्याच्या मागावर होते, दिनांक १८.०७.२०२५ रोजी श्री. शिवाजी बंटेवाड पोनि स्थागुशा, बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीलायक बातमी मिळाली की, सदर इसम हा पैठण तालुक्यात चोरुन लपुन वावरत आहे. त्यावरुन पोनि स्थागुशा, बीड यांनी पोउपनि सिद्धेश्वर मुरकुटे स्थागुशा, बीड यांचे पथक रवाना केले. सदरच्या इसमास पथकाने दि. १८.०७.२०२५ रोजी मुंगी फाटा येथे ताब्यात घेवून पोलीस ठाणे चकलांबा येथे दि. १८.०७.२०२५ रोजी २०.२५ वा हजर केले व त्यानंतर योग्य पोलीस बंदोबस्तात स.पो.नि चकलांबा यांनी ताबे पोलीस अंमलदारा मार्फत हसुंलकारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १९.०७.२०२५ रोजी ०१.१५ वा. हजर करुन स्थानबध्द केले आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविपोअ गेवराई श्री. निरज राजगुरु, पो.नि. श्री. शिवाजी बंटेवाड, स्थागुशा बीड, यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि श्री संदीप पाटील, पोउपनि अनंता तांगडे, सफौ सोमनाथ कुलकर्णी, अमोल येळे, कैलास खटाणे सर्व पो. स्टे चकलांबा पोउपनि सिद्धेश्वर मुरकुटे, सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोह राहुल शिंदे, विकास राठोड, मनोज परजणे, अश्पाक शेख नितीन वडमारे, बिबोसेन चव्हाण स्थागुशा बोड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुचा काळाबाजार करणारे, जुगार लॉटरी खेळणारे व खेळवीणारे तसेच धोकादायक गुंड यांचेवर व दादागिरीकरणाऱ्या व खंडणी बहाद्दर गुंडावर जास्तीत जास्त चझऊ- कायदया अंतर्गतकठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.

# उटी पूर्णा गावात हिंगोली,जिंतूर व लोणार आगाराची बस सेवा सुरु



**सेनगांव । प्रतिनिधी**

हिंगोली जिल्ह्यातील मराठवाडा आणि विदर्भाच्या सिमेवर असलेल्या उटी पुर्णा गावात हिंगोली,जिंतुर व लोणार या तिन्ही आगाराच्या बस सेवा सुरू झाली आहे हिंगोली जिल्ह्यातील असे एकमेव गाव आहे की या गावांमध्ये तिन्ही आगाराच्या बस सेवा येत आहेत त्यामुळे येथील ग्रामस्थांना हिंगोली,बुलडाणा व परभणी जाण्यासाठी गावातुन बस सेवा मिळत असल्याने गावकऱ्यांना प्रवास करायला सुखकर झाले आहे.

दि.१५ जुलै पासुन लोणार आगारची महामंडळाची एस.टी. बसचे उटी (पूर्णा) या गावी आगमन झाले असुन सदर बस लोणार आगार येथुन सकाळी आठ वाजता निघेल व उटी(पूर्णा) या गावी सकाळी नऊ वाजता पोहचेल तसेच दुपारी तीन वाजता लोणार येथून निघेल व ती बस उटी(पूर्णा) येथे सायंकाळी चार वाजता पोहोचेल सदर बस लोणार,नांद्रा,टिटवी रायगाव,धानोरा मार्गे उटी पुर्णा असा प्रवास करत आहे तसेच हिंगोली आगाराची महामंडळाची एसटी बस देखील येत आहे.जिंतूर आगाराची बस मुक्कामी गावात येत आहे.लोणार आगाराच्या बसच्या चालक आणि वाहक यांचे स्वागत करताना सरपंच प्रतिनिधी शिवाजी राजाराम गडदे,स्थानिक रहिवासी ग्रामपंचायत अधिकारी जे.डी. मस्के, निवृत्ती शेषराव मस्के शिवाजी सर्जेराव गडदे कुंडलिक दादाराव गडदे रामराव दत्तराव मस्के, किसन नारायण गडदे विठ्ठल कान्होजी कचरे शेखर माणिक पहिले कृष्णा संतोष गडदे वामन मारोतराव कारघोडे भगवान परमेश्वर गडदे विष्णू मारुती गडदे, बालाजी विश्वनाथ हाके दिगंबर विश्वनाथ हाके,व इतर असंख्य नागरिक गावकरी मंडळी उपस्थित होते.

### राज्य शासनाचे 'मेक इन महाराष्ट्र नॅचरल फ्लॉवर्स' धोरण

# शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीवरून मंत्री पंकजा मुंडे यांचा सकारात्मक निर्णय

**मुंबई (वृत्तसंस्था)**-राज्यातील शाश्वत शेती आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी कृत्रिम प्लास्टिक फुलांच्या वापरावर निर्बंध आणण्याच्यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण बैठक गुरूवारी विधानभवन येथे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. मंत्री व आमदारांनी केलेल्या सुचनांचा विचार करून राज्य शासन कृत्रिम फुलांबाबत स्वतंत्र निर्णय घेण्याचा विचार करणार असून 'मेक इन महाराष्ट्र नॅचरल फ्लॉवर्स' धोरण अंमलात आणण्यासाठी सकारात्मक असल्याचे ना. पंकजा मुंडे यांनी सांगितले.

बैठकीला रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री ना. भरतशेठ गोगावले, आ. महेश शिंदे, आ. सुनील शेळके, आ. अमल महाडिक, आ. रोहित पाटील, आ. विश्वजीत कदम यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मंत्री व आमदारांनी कृत्रिम फुलांच्या वाढत्या वापरामुळे राज्यातील फूल उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याबाबत चिंता व्यक्त केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, राज्यात कृत्रिम फुलांच्या बाबतीत उत्पादन, आयात, विक्री व नियमन आणण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करावे. कृषी फुलांचा वापर वाढवणार्या शासकीय व सार्वजनिक उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे. कृषी फूल उत्पादक शेतकर्यांसाठी अनुदान, प्रशिक्षण आणि हरितगृह तयार करण्यासाठी सवलती द्याव्यात. पर्यावरण व आरोग्य विषयक अभ्यास समितीमार्फत कृत्रिम फुलांचे दुष्परिणाम यावर सखोल शास्त्रीय अहवाल तयार करावा. 'मेक इन महाराष्ट्र नॅचरल फ्लॉवर्स' अशा अभियानाच्या माध्यमातून कृषी फुलांना बाजारपेठ



उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विशेषतः झेंडू, गुलाब, जास्वंद यासारख्या पारंपरिक फुलांच्या मागणीत घट झाली आहे. राज्यातील शेतकरी गुलाब, झेंडू, जास्वंद, ट्युलिप, कार्नेशन, रजनीगंधा इत्यादी निर्यातक्षम फुलांची उत्पादन क्षमता विकसित करत आहेत. हरितगृह शेती करणार्या शेतकर्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. कृत्रिम फुलांचे उत्पादन प्रामुख्याने न विघटनशील घटकांपासून म्हणजे पॉलीस्टर, नायलॉन, प्लास्टिक आणि सिंथेटिक रंगांपासून होते. त्यामुळे त्याचा पर्यावरणावर दीर्घकाळ विपरीत परिणाम होतो. जलप्रदूषण आणि मातीच्या गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. अशा फुलांवर वापरली जाणारी रसायने मानवी आरोयालाही धोका निर्माण करत आहेत, याकडे मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले यांनी लक्ष वेधले. पर्यावरण मंत्री ना. पंकजा मुंडे म्हणाल्या, शेतीसाठी अनुकूल धोरणे राबवणे आणि पर्यावरणाचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे. कृत्रिम फुलांवर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र धोरण आखण्याबाबत विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.रोजगार हमी मंत्री भरत गोगावले म्हणाले, हरितगृह शेती, ठिबक सिंचन, नियंत्रित तापमान या आधुनिक पद्धतींचा वापर करून शेतकरी फुलांची निर्यातक्षम उत्पादन क्षमता वाढवत आहेत. यावेळी कृत्रिम फुलांचा अनियंत्रित वापर हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला मारक असल्याचे त्यांनी सांगितले.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला ३०० कोटींचा निधी वर्ग

**मुंबई (वृत्तसंस्था)**-महाराष्ट्र सरकारकडून विविध महामंडळांद्वारे उद्योजक तयार करण्यासाठी आर्थिक सहाय्य पुरवले जाते. मराठा समाजात उद्योजकतेला चालना देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला राज्य सरकारने मोठा निधी दिला आहे.अर्थसंकल्पात या महामंडळासाठी ७५० कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या संदर्भातील शासन निर्णय १ ५ जुलै रोजी जारी करण्यात आला असून, या निर्णयानुसार ३ ०० कोटी रुपयांचा निधी महामंडळाला वर्ग करण्यात आला आहे. महायुती सरकारच्या या निर्णयामुळे मराठा समाजात नवीन उद्योजक निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळणार आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून स्वयंरोजगार आणि उद्योजकतेला गती देण्यासाठी विविध योजना राबवल्या जातात. या योजनांसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी आता ३०० कोटी रुपयांचा निधी प्रत्यक्ष वर्ग करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाने प्रसिद्ध केला आहे.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला ३०० कोटींचा निधी वर्ग झाल्याबद्दल नरेंद्र पाटील यांनी समाधान व्यक्त केले. ते म्हणाले की, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला ३०० कोटींचा निधी वर्ग करण्यात आल्याचा शासन निर्णय सगळ्यांना मिळाला असेल. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मी आभार मानतो.



# झुडपी जंगल क्षेत्रावरील नागरिकांना दिलासा:कोणालाही बेघर होऊ देणार नाही-महसूल मंत्र्यांचे विधानसभेत आश्वासन

**नागपूर (वृत्तसंस्था)**-सर्वोच्च न्यायालयाने २२ मे २०२५ रोजी आदेश पारित करून विदर्भातील झुडपी जंगल जमीन वन क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे पालन करीत झुडपी जंगल क्षेत्रावर घर असलेल्या नागरिकांना शासन बेघर होऊ देणार नाही, अशी ग्वाही विधानसभेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. विदर्भातील सहा जिल्ह्यातील झुडपी जंगलाबाबत विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचेनच्या चर्चेत सदस्य सर्वश्री राजकुमार बडोले, संजय मेश्राम यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.येत्या आठवड्यात मानक कार्यप्रणाली (एसओपी) जारी होईल, त्यामुळे स्थानिक जनतेचा संभ्रम दूर होईल. गरज भासल्यास पुनर्विचार याचिका दाखल करून सरकार विदर्भातील जनतेच्या हिताचे रक्षण करेल, असेही बावनकुळे म्हणाले. यापैकी १९९६ पूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे वाटप करण्यात आलेले झुडपी जंगल



क्षेत्र नियमित करण्यासाठी केंद्रीय समितीला प्रस्ताव पाठवण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. त्यानुसार शासन केंद्रीय वन विभागाच्या केंद्रीय सशक्तता समितीला फॉरमॅट' नुसार १९९६ पूर्वी वाटप केलेल्या झुडपी जंगल क्षेत्राची माहिती देणार आहे. याबाबत एक महिन्याच्या आत ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. तसेच १९९६ नंतर अतिक्रमणाबाबत माहिती केंद्रीय वन विभागाला सादर करण्यात येत आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या संरक्षित क्षेत्र आणि वाटप केलेली जमीन याबाबत संभ्रम दूर करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे. त्यानंतर याबाबत सुस्पष्ट शासन निर्णय काढण्यात येईल.झुडपी जंगल क्षेत्र ९२ हजार ११५ हेक्टर आहे. यामध्ये अतिक्रमण असलेले २७ हजार ५६० हेक्टर, वनेतर वापर २६ हजार ६७२ हेक्टर क्षेत्रावर आहे. यामध्ये वनीकरण अयोग्य असलेली जमीन ८६ हजार हेक्टर आहे. तसेच वन व महसूल विभागाच्या नावाने असलेले ३२ हजार हेक्टर संरक्षित क्षेत्र आहे. झुडपी असलेले ३ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र संरक्षित वने घोषित करण्यात आले आहे. हे क्षेत्र वापरता येतील, या जमिनीचे हस्तांतरण करण्याची गरज नाही, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# व्हिडिओ शूटिंग केल्याचा जर राग येत असेल तर कर्मचारी काम करीत नसल्याचा का राग येत नाही?

## दिवाने मॅडम आपण जनतेच्या सेवक आहेत ; मालक नाही?

## गटविकास अधिकारी आणि नागरिक यांचा व्हिडिओ व्हायरल!

### मोबाईल शूटिंग बंद करा म्हणून गटविकास अधिकाऱ्यांनी केला पळ काढण्याचा प्रयत्न

## दिवाने मॅडमचे असंविधानिक दीवानापन जनतेच्या माथी



**केज । गौतम बचुटे**

तो मोबाईल बंद करा
मी मोबाईल बंद करणार नाही
हे ऑफिस आहे
तुमचे प्रशासकीय कर्मचारी जाग्यावर हजर नसतात

हा संवाद आणि याचे व्हिडिओ केज येथील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी आणि शेतकऱ्याचा असून तो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.दि. १८ जुलै रोजी दुपारी केज तालुक्यातील देवगाव येथील शेतकरी कैलास मुंडे हे त्यांच्या वडिलांच्या नावाने मनरेगा योजने अंतर्गत दाखल केलेल्या प्रस्तावाच्या शेततळ्याच्या कामासाठी चकरा मारीत आहेत. परंतु त्यांना प्रशासकीय अधिकारी भेटत नसल्याने त्यांनी प्रभारी गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणे यांची भेट घेऊन त्यांच्या पुढे कैफियत मांडली. त्याच वेळी त्यांनी गटविकास अधिकारी



समृद्धी दिवाणे आणि त्यांच्यातील संवादाचे व्हिडिओ शूटिंग करीत असताना गटविकास अधिकारी त्याच्यावर प्रचंड संतापल्या आणि त्यांनी ते व्हिडिओ चित्रण बंद करण्याचे करण्याचे सुनावले. मात्र त्यावर सदर शेतकऱ्याने देखील त्यांना सांगितले की, तुमचे प्रशासकीय अधिकारी भेटत नाहीत. मुंडे यांनी मे महिन्यात प्रस्ताव सादर करून देखील त्यांच्या उदासीन धोरणामुळे त्यांना शेततळ्याचे खोदकाम करण्यासाठी तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना देखील त्यांना प्रारंभ आदेश न दिल्यामुळे त्यांचे शेत तळ्याचे काम करता आलेले नाही. यामुळे कैलास मुंडे आणि त्यांचे वडील यांच्या शेतातील पिकांचे नुकसान झालेले आहे. व्हिडिओ मध्ये कॅमेऱ्या पासून स्वतःला बाजूला ठेवण्यासाठी गटविकास.अधिकारी प्रयत्न करीत असल्याचे आणि त्या शेतकऱ्याला ही सरकारी कार्यालय आहे असे दरडावून सांगत असल्याचा व्हिडिओ कैलास मुंडे यांनी त्याच्या सोशल मीडियाच्या अकाऊंटवरून व्हायरल केला आहे.

या प्रकरणीकामासाठी पंचायत समितीच्या कार्यालयात आलेल्या नागरिकांशी अधिकारी भेटत नाहीत म्हणून गाऱ्हाणे सांगणाऱ्या एका शेतकऱ्यांना हे ऑफिस आहे व्हिडिओ रेकॉर्डिंग बंद करा असा दम देत कॅमेऱ्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत असलेल्या गटविकास अधिकाऱ्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. याची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणे यांची या बाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याच्या प्रयत्न केला असता त्यांनी फोन स्वीकारला नाही. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया समजू शकलेली नाही.

> **“ मी शेततळ्यासाठी मे महिन्यापासून चकरा मारीत आहे मात्र या लालफितीच्या कारभारामुळे शेततळ्याचे काम न करू शकल्याने पावसाने ओढ दिली असल्याने माझे खरिपाचे पीक धोक्यात आले आहे. या बाबत मी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करणार आहे.**
>
> **–कैलास मुंडे,**
> **शेतकरी, देवगाव**

## नाव्होली येथील सखाराम (बापू) बिक्कड यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

### माणूस म्हणून माणुसकी मिळवणारे नेतृत्व हरवल्याने गावासह परिसरातून हळहळ व्यक्त

**केज । प्रतिनिधी**

चहा सारख्या छोट्याशा व्यवसायातून वटवृक्ष उभा करणारे, आध्यात्मिकतेचा लळा असणारे आणि यातुनच बापु हि एक वेगळी ओळख निर्माण करणारे सखाराम सुखदेव बिक्कड (बापू) यांचे काल हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. सविस्तर माहिती अशी की केज तालुक्यातील नाव्होली येथील एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील सखाराम सुखदेव बिक्कड (बापू) यांनी काही वर्षांपूर्वी शेतीला जोडव्यवसाय म्हणून चहासारखा छोटासा व्यवसाय सुरू केला होता. त्यांनी सर्वांशी प्रेमाचे संबंध निर्माण करुन सखाराम बापू हे नाव सर्वोपरिचीत केले. त्यांना अध्यात्माचे वेड असल्याने त्यातुनही त्यांची वेगळी ओळख होती.परंतु अशा एका मनमिळावू स्वभाव असणाऱ्या बापूवर काल काळाने घाला घातला.



सखाराम सुखदेव बिक्कड वय वर्षे ५८ वर्ष यांचे काल दि. १९ जुलै शणिवार रोजी सकाळी ९:३० वाजण्याच्या सुमारास आपल्या हॉटेल वर असताना सर्वांशी बोलत असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांना तात्काळ उपचारासाठी बिड येथे हलविण्यात आले. मात्र हा झटका अतिशय तीव्र असल्याने त्यांची वाटेतच प्राणज्योत मालवली. पाहाता पाहाता हि बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली आणि नाव्होली गावावर शोककळा पसरली. आणि दुपारी ३:०० वाजता अंत्यविधी असल्याचे सर्वत्र निरोप गेल्याने गावातील सर्व लहान थोर व त्यांचे चाहते अंत्यविधी साठी जमले होते. दुपारी ३:०० वाजता शोकाकूल वातावरणात सखाराम (बापू) बिक्कड यांचेवर त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधी साठी भाजपचे जेष्ठ नेते नंदुशेठ काकाजी मुंदडा,संतोष दादा हांगे, नंदु दादा मोराळे ,सुमंत धस यांचेसह गावातील सर्व ग्रामस्थ नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात वृद्ध आई वडील, बहिणी,दोन मुले, मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सखाराम (बापू) बिक्कड यांच्या निधनाने नाव्होली गावावर शोककळा पसरली असून सर्व पत्रकार आणि त्यांचा परिवार त्यांच्या दुःखात सहभागी आहे. तर त्यांच्या रक्षा सावरण्याचा कार्यक्रम दि. २१ जुलै सोमवार रोजी सकाळी ७:३० वाजता ठेवण्यात आला आहे.

## धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांवरील अन्याय कदापि सहन करणार नाही–मीनाक्षी देवकते

### तुलसी इंग्लिश स्कूलच्या धनगर समाज विद्यार्थी वस्तीगृहाचा आदर्श इतर शाळेने घ्यावा

**बीड । प्रतिनिधी**

धनगर समाजाच्या सामाजिक कार्यकर्त्या अहिल्या महिला आघाडीच्या प्रदेश सचिव मीनाक्षी देवकते डोमाळे यांनी दिनांक१३/७/२०२५ रोजी तुलसी इंग्लिश स्कूल येथील धनगर समाजाच्या विद्यार्थिनींसाठी असणाऱ्या वस्तीगृहामध्ये भेट दिली. त्यावेळी त्या प्रथम मुलींच्या वस्तीगृहात व नंतर मुलांच्या वस्तीगृहासाठी भेट देण्यासाठी गेल्या त्यांनी सर्व सुविधा त्यामध्ये स्वच्छता, जेवणाची, त्यांच्या राहण्याची व्यवस्था यांची तपासणी केली. एवढेच नव्हे तर स्वतः जेवण पण तिथेच केले.बीड जिल्ह्यामध्ये जेवढे इंग्लिश धनगर समाजाच्या स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह आहेत, तेवढ्या सगळ्या वस्तीगृहांना आणि शाळेला अचानक कुठलेही दिवशी भेट दिली जाणार आहे.



ज्या शाळेमध्ये धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना निधी वापरला जात नाही, त्या शाळेची तात्काळ जिल्हाधिकारी, गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे आणि धनगर समाजाच्या मुला मुलींसाठी वस्तीग्रह समिती स्थापन केलेली आहे त्यांच्याकडे तक्रार दिली जाणार. बीडमधली पहिले वस्तीगृह मुलींचं तपासले आहे. तिथे आम्हाला सर्व व्यवस्थित वाटले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते माऊली शिरसाट, सोनवणे मॅडम, जायभाय मॅडम आणि काही पालक यावेळी उपस्थित होते.

## समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध–राज्यमंत्री नाईक

### गोर बंजारा समाजाच्या एकता मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; राज्यस्तरीय गोर बंजारा भूषण पुरस्काराचे वितरण

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध आहे. बंजारा समाजाचे देखील विविध प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे प्रतिपादन उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.गेवराई येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त गोर बंजारा समाजाच्यावतीने आयोजित एकता मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित, मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख रामेश्वर नाईक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे सहआयुक्त विजय राठोड, साहेबराव शास्त्री महाराज, सचिन महाराज, चैतन्य महाराज, अमरसिंह पंडित, नाईक फाऊंडेशनच्या डमोहिनीताई इंद्रनील नाईक, उत्तम चव्हाण, प्रा. पी.टी.चव्हाण, बाबुराव




जाधव, अण्णासाहेब राठोड, राजेश पवार, सतीश पवार, अनिल राठोड आदींची उपसिवती होती.

राज्यस्तरीय बंजारा भूषण पुरस्कार समस्त गोर समाजाच्या वतीने देऊन राज्यमंत्री नाईक यांना सन्मानित करण्यात आले. यासह राज्य लोकसेवा आयोग, दहावी, बारावी, अभियांत्रिकी आदी क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या गुणवंतांचा राज्यमंत्री नाईक यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. अमरसिंह पंडित, उत्तम चव्हाण, पी.टी.चव्हाण, रामेश्वर नाईक, साहेबराव शास्त्री, ड मोहिनी नाईक यांनी विचार मांडले. सुरूवातीला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रास्ताविक उत्तम चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले.गेवराई एमआयडीसीसंदर्भातील बैठक लवकरच घेण्याबाबत पुढाकार घेण्यात येईल, अशी ग्वाही उद्योग राज्यमंत्री नाईक यांनी यावेळी दिली. यासह गावतांड्यावर शासनाच्या विविध कल्याणकारी योजना पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी सांगितले.

## साहित्य रत्न आणाभाऊ साठे जयंती निमित्त शांतता समितीची बैठक संपन्न



**केज । गौतम बचुटे**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमीत्त केज पोलिस ठाण्या शांतता समितीची बैठक संपन्न झाली.केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमीत्त शांतता समिती बैठक आयोजित केली होती. या बैठकीला केज शहरातील व ग्रामीण भागातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटीचे सदस्य, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, व्यापारी बांधव, पत्रकार उपस्थित होते.

या वेळी जयंतीच्या मिरवणुकीच्या वेळी निर्माण होणाऱ्या समस्या या बाबत उपस्थितांनी माहिती देत त्यासाठी प्रशासनाने आणि उत्सव समितीच्या वतीने घ्यावयाची काळजी या बाबत चर्चा झाली. यावेळी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे , सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी अजित ढोपे, पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी संवाद साधताना पोलिस उपनिरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी जयंती उत्सव साजरा करताना शासनाच्या नियमांचे व अटींचे काटेकोरपणे पालन करावे. त्याचे उल्लंघन झाल्यास त्या बाबत प्रशासन कठोर पावले उचलणार असून कोणाचीही गय केली जाणार नाही. असा इशारा पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी दिला. तसेच राष्ट्रपुरुषांची जयंती सर्व नागरिकांनी एकत्र येऊन शांतेतपूर्ण वातावरणात साजरी करण्याचे आवाहन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077